## बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि.०२ एप्रिल २०२३

### विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १७९/२०२३ भादंविसक ३८०,४५७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०१/०४/२०२३ रोजी ०२.३० वा ते ०३.१५ वा चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी,सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०१/४/२०२३ रे ाजी २३.२९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | हणुमंत व्यंकटराव पाटील,वय-६३ वर्षे,रा- १७५/१,भवानी निवास सिंधू विहार विजापूर रोड जुळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ६,५००/- रूपये त्यात एक टायटन गोल्डन रंगाची घडयाळ ,रोख रक्कम. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे राहते घराचे वरच्या मजल्यावर झोपले असता खालच्या घरात कोणीही नसताना घराचे सेफ्टी डोर व मुख्य दरवाजाचे कडी कोयंडा कशाने तरी तोडून दरवाजा उघडून आत बेडरूममध्ये असलेले लाकडी फर्निचर कपाटाचे लॉक कशाने तरी तोडून उघडून त्यामध्ये आसलेला नमुद वर्णनाचे व किंमतीचे घडयाळ व रोख रक्कम व भाग्यश्री भानुदास गायकवाड यांच्या कडील सोन्याची दागिने कोणीतरी अज्ञात इसमाने मुद्दाम लबाडीने चोरून नेले आहे.म्हणून.<br>तपास:- पोह/१२२४/गवळी- ८९९५५८१२७६ |

### एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १९८/२०२३ भादंविसक ४२० सह आयटीॲक्ट ६६ (ड) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १२/०३/२०२३ रोजी ते दि १६/०३/२०२३ रोजी पर्यत फिर्यादीचे घरी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०१/०४/२०२३ रोजी १८.३४ वा |
| **फिर्यादीचे नाव** | : | योगेश गोपाळ बुट्टा वय-२५ वर्षे,व्यवसाय- शिलाई कामगार, रा-५०,दिपाली नगर विनायक नगर शेजारी एमआयडीसी रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) @erin९९०१ टेलिग्राम लिंक वापरत असलेला इसम, २) कारिवाला इंडस्ट्रिज लिमीटेंड हा ॲप वापरत असलेला इसम नाव पत्ता माहित नाही. |
| **फसवणूक र** | : | २,५६,९१४/-रूपये |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे मोबाईल क्रमांक ८३२९०४१६८५ यावरती कारिवाला इंडस्ट्रिज लिमीटेड या नावाचे कंपनीचे टेक्स मेसेज आला की आम्ही नोकर भरती करत आहोत ज्यातून तुम्हाला दररोज निश्चीत १६८८/- ते ३०,०००/- रू घरी बसून कमवु शकता अशा स्वरूपाचा टेक्सट मॅसेज आला व त्यातील लिंकवर फिर्यादीने क्लिक केल्यानंतर +९१-८००६६३३१५७ या नंबरचे व्हॉटसअॅप ओपन झ ााले फिर्यादीने त्यावर हाय मेसेज पाठविला त्यानंतर त्यांनी आम्ही नोकर भरती करत आहोत. असे मेसेज केल्याने फिर्यादीला पुर्ण वेळ नोकरीची गरज असल्याने फिर्यादीने वरील आरोपीत यांनी पाठवलेली लिंकवर https://sp६६in/register?invite-code-bffa२९ रजिस्ट्रेशन केले त्यानंतर फिर्यादीस टेलिग्रॅम चॅनलवर @erin९९०१ हे सर्च करून त्यावर रिक्वेस्ट पाठविली.आरोपीतांनी फिर्यादीस कारीवाला ॲप डाऊनलोड करायला सांगून त्यावरती ऑनलाईन शॉपिग करायला सांगून त्यावर ५ % ते २० % पर्यत तुम्हाला कमिशन मिळेल असे सांगून ऑर्डर करायला लावले फिर्यादीने सुरवातील २००/- रूपयची ऑर्डर केली त्यावर फिर्यादीस २४७/ रू मिळाले त्यानंतर फिर्यादीने आणखी १०००/- रू चे दोन ऑर्डर केल्या त्यावर फिर्यादीस १,१४०/- रूपये परत आले ते आलेले |

| | | |
|---|---|---|
| | | सर्व पैसे फिर्यादीने अकांऊट वर काढून घेतले.<br>त्यानंतर वरील आरोपीत यांनी फिर्यादीस २,५०,०००/- रू चे २७ ऑर्डर करण्यास सांगितले त्यावर फिर्यादीचा विश्वास असल्याने दि १२/०३/२०२३ ते दि १६/०३/२०२३ या कालावधीत वेळोवेळी ते सांगेल त्याप्रमाणे २७ ऑर्डर पुर्ण करण्याकरीता युपीआय पेमेंट ते सांगेल त्या युपीआय आयडीवर पाठविले.परंतु फिर्यादीने आरोपीताना मी भरलेले पैसे मला परत कधी देणार याबाबत विचारणा केली असता आणखीन तीन ऑर्डर पुर्ण केल्यानंतर तुम्हाला तुमचे कमिशन सह पैसे मिळतील असे सांगितले परंतु पुढील तीन ऑर्डर या २,५०,०००/- रू च्या वरच्या असल्याने फिर्यादी तो पुर्ण करू शकला नाही.फिर्यादीने वरील आरोपीतास मागील २७ ऑर्डरचे पैसे मागितले असता आम्ही तुम्हाला ते पैसे देवू शकत नाही तुम्ही पुढील तीन ऑर्डर पुर्ण केल्या तरच आम्ही पैसे देवू असे म्हणल्याने फिर्यादीचे लक्षात आले की सदर वरील आरोपीत हे फिर्यादीची फसवणूक करत आहेत म्हणून.तपासः- दुपोनि दराडे- **८३९००९००९९** |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १९९/२०२३ भादंविसक ३८० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०१/०४/२०२३ रोजी १०.३० वा ते १२.३० वा दरम्यान फिर्यादीचे राहते घरी,सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०१/०४/२०२३ रोजी २०.१० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | चंद्रकांत सिध्देश्वर बिज्जा,वय-२५ वर्षे, रा- २३५६,एच ग्रुप जुना विडी घरकुल सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ७,५००/- रूपये त्यात भारतीय चलनी नोटा त्यात ५०० दराचे एकूण १५ नोटा. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे बाहेर गेले असता यातील अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे राहते घरात प्रवेश करून कपाटाची चावी उघडून त्यातील रोख रक्कम चोरी केली आहे.म्हणून.तपासः- पोह/१२७/पाटील- ९३५६६३६३४८ |